सत्यमेव जयते
उपवनसंरक्षक,
अमरावती वनविभाग, अमरावती कार्यालय
कॅम्प अमरावती ४४४ ६०२

दूरध्वनी क्रमांक०७२१-२६६२८१४,(फैक्स) २५५०१४४
ई-मेल dycfamravati@mahaforest.gov.in,dcfamtdn१४@gmail.com

क्रमांक :- कक्ष-७/सर्व्हे /नकाशे/4605/ २०२३-२४
अमरावती, दिनांक 28/02/2024

प्रति,

कार्यकारी अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग विभाग,
अमरावती.

विषय :- नांदगाव पेठ ते वरुड - पांढुर्णा राज्य महामार्ग NH-३५३ K मध्ये बाधित होणा-या वनविभागाच्या १४.९७९ हे. वनजमीनी बाबत वन (संवर्धन)अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्ताव.

संदर्भ :- १.केंद्र शासन पत्र क्र.एफ न.एफ सी-II/एम एच २३६/२०२३-एनजीपी/१२६२१ दिनांक,१२.१२.२०२३.
२.अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,महाराष्ट्र राज्य,नागपुर यांचे कडील पत्र क्र.कक्ष-१७/नोडल/अमरावती आयडी-२४७/१०२७०७, दि.१५/२/२०२३
३.मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती यांचे पत्र क्र.कक्ष-४/जमीन/प्र.क्र.८१५/१/२७२७ दिनांक २१.१२.२३
४. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-७/सर्व्हे/व.सं.अ १९८०/४१५१ दि.३१./०१/२०२४
५.आपले कार्यालयीन पत्र क्र ३०४ P.O.२/२०२४ दि०७/०२/२०२४
६.अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,महाराष्ट्र राज्य,नागपुर यांचे कडील पत्र क्र.कक्ष-१७१/FCA-५१/PID-२४७१०/अमरावती ७५६, दि.०८/०६/२०२३

—o—

उपरोक्त विषयांचे अनुषंगाने नांदगाव पेठ ते वरुड - पांढुर्णा राज्य महामार्ग NH-३५३ K मध्ये बाधित होणा-या वनविभागाच्या १४.९७९ हे. वनजमीनी बाबत वन (संवर्धन)अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्तावाबाबत संदर्भिय पत्र क्र.१ नुसार केंद्र शासन स्तरावरुन सदर प्रस्तावा संबधी अ.क्र.१ ते ४ त्रुटीबाबत पुर्तता अहवाल सादर करण्याचे निर्देश आहेत.त्या नुसार संदर्भिय पत्र क्र.४ अन्वये आपणास केंद्र शासन पत्रातील त्रुटी अ.क्र.२ मध्ये नमुद मुदयाबाबत उपशमन-उपाययोजने बाबत आराखडा तयार करुन मुख्य वन्यजीव रक्षक,महाराष्ट्र राज्य यांची मान्यता घेण्याबाबत रितसर प्रस्ताव मंजुर करुन ऑनलाईन व ऑफलाईन सादर करण्याबाबत कळविले होते.संदर्भिय पत्र क्र.५ नुसार मुद्दा क्र.३ मध्ये उपशमन-उपाययोजने बाबत आपण आपले कडिल पत्र क्र.६७९ दि.१७.०४.२०२३ अन्वये Undertaking सादर केलेला आहे.

परंतु उपशमन-उपाययोजने बाबत आराखडा तयार करुन अद्याप सादर केलेला नाही.केंद्र शासन पत्रातील त्रुटी अ.क्र.३ नुसार संदर्भिय पत्र क्र.६ अन्वये वनजमीन वळती करण्याच्या प्रस्तावामध्ये ८ गावापैकी अ.क्र.१ ते ४ ही गावे व्याघ्र भ्रमण मार्गात येत असल्याने राष्ट्रीय महामार्गाचे विस्तारी करणामध्ये गावातील वन आणि वनेत्तर क्षेत्रासाठी वन्यजीव

मान्यतेचा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविलेले आहे. परंतु वन्यजीव मान्यता घेतल्याबाबत कोणतेही दस्ताऐवज सादर केलेली नाही.

त्या अनुषंगाने उपशमन-उपाययोजने बाबत आराखडा तयार करुन मुख्य वन्यजीव रक्षक,महाराष्ट्र राज्य यांची मान्यता घेवुन तात्काळ सादर करावा.तसेच वनजमीन वळती करण्याच्या प्रस्तावामध्ये ८ गावापैकी अ.क्र.१ ते ४ ही गावे व्याघ्र भ्रमण मार्गात येत असल्याने राष्ट्रीय महामार्गाचे विस्तारी करणामध्ये गावातील वन आणि वनेत्तर क्षेत्रासाठी वन्यजीव मान्यतेची माहिती सादर करण्यात यावी.जेणे करुन केंद्र शासनाचे पत्रातील त्रुटीची पुर्तता तयार करुन वरिष्ठ कार्यालयास सादर करणे शक्य होईल.

करिता वरिल प्रमाणे माहितीस व पुढील कार्यवाहीस अग्रेषीत.

(श्रीमती दिव्याभारती एम.)
उपवनसंरक्षक,
अमरावती वनविभाग, **अमरावती.**

**प्रतिलिपी** - अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,महाराष्ट्र राज्य,नागपुर यांना माहिती करिता सविनय सादर.

**प्रतिलिपी** - मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती यांना माहिती करिता सविनय सादर.

**प्रतिलिपी** - वनपरिक्षेत्र अधिकारी,वरुड यांना कळविण्यात येते वन आणि वनेत्तर क्षेत्रा आवश्यक उपशमन-उपाययोजने बाबत संबधीत यंत्रणेला आवश्यक माहिती देण्यात यावी.